# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः13.11.2024** **वारःबुधवार**

---

१.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज बिहारमधल्या विकासप्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण होणार
२.इ कॉमर्सच्या माध्यमातून होणाऱ्या अन्नपदार्थांच्या विक्रीबाबत भारतीय अन्न सुरक्षा आणि प्रमाणीकरण प्राधिकरणाच्या सूचना
३.झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदानाला सुरुवात
४.२०२४ हे आतापर्यंतचं सर्वाधिक उष्ण वर्ष ठरण्याची शक्यता
आणि
५.भारत आणि दक्षिण अफ्रिका संघांमध्ये आज वीस षटकांचा तिसरा क्रिकेट सामना

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सध्या तीन दिवसांच्या दादरा, नगर हवेली आणि दीव दमण या केंद्रशासित प्रदेशाच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात आज राष्ट्रपतींच्या हस्ते आज सिल्वासा इथल्या झेंडा चौक शाळेचं उद्घाटन होणार आहे. झेंडा चौक शाळेचं संकुल अत्याधुनिक असून तिथं सुमारे १२ हजार विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारच्या आधुनिक सोईसुविधा उपलब्ध आहेत.
राष्ट्रपती आज सिल्वासामधल्या नमो वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्थेला भेट देऊन तिथल्या प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. तसंच त्या दीव इथल्या आयएनएस खुक्री स्मारकाला भेट देतील.

**पंतप्रधान बिहार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज बिहारमधल्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण होणार आहे. यामध्ये दरभंगा इथं उभारण्यात येणाऱ्या एम्स संस्थेच्या पायाभरणी समारंभाचा समावेश आहे. या एम्स संस्थेत सुसज्ज आधुनिक रुग्णालयासह आयुष विभाग, वैद्यकीय महाविद्यालय, परिचारिका महाविद्यालय आणि निवासी सुविधा असतील. मिथिलांचल भागातल्या नागरिकांचं हे गेल्या अनेक वर्षांपासूनचं स्वप्न असून पुढच्या तीन वर्षांत ते पूर्ण होईल असं आमच्या वार्ताहरानं म्हटलं आहे.
याबरोबरच विविध राष्ट्रीय महामार्ग आणि रेल्वे प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी, १८ जनऔषधी केंद्रांचं उद्घाटन यासह पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू प्रकल्पांची पायाभरणी पंतप्रधान करणार आहेत.

**जयशंकरसौदी**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर आणि सौदी अरेबियाचे परराष्ट्रमंत्री राजपुत्र फैसल बिन फरहान अल सौद यांच्यात आज नवी दिल्लीत बैठक होणार आहे. दोन्ही देशांमध्ये अनेक शतकांपासून मैत्रीपूर्ण आर्थिक तसंच सामाजिक सांस्कृतिक संबंध आहेत. भारत हा सौदी अरेबियाचा दुसऱ्या क्रमांकाचा व्यापारी भागीदार आहे तर सौदी भारताचा चौथ्या क्रमांकाचा व्यापारी भागीदार आहे. दर वर्षी होणारी हज यात्रा हादेखील दोन्ही देशांमधला महत्त्वाचा दुवा असल्याचं आमच्या वार्ताहरानं म्हटलं आहे.

**अन्नसुरक्षा**

इ कॉमर्सच्या माध्यमातून ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांची वापरण्यायोग्य असण्याची मुदत ते ग्राहकांना मिळाल्यानंतर किमान ४५ दिवसांपर्यंत असेल याची खबरदारी घेण्यात यावी असं भारतीय अन्न सुरक्षा आणि प्रमाणीकरण प्राधिकरणानं म्हटलं आहे. त्यानुसार या कंपन्यांनी आपली कार्यपद्धती ठरवावी असं प्राधिकरणानं म्हटलं आहे. यामुळे ग्राहकांना चुकीची माहिती मिळणं थांबेल आणि त्यांच्या हिताचं संरक्षण होईल असं प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जी. कमला वर्धन राव यांनी म्हटलं आहे. प्राधिकरणानं यासंदर्भात स्विगी आणि झोमॅटो यासारख्या कंपन्यांच्या प्रतिनिधींची काल नवी दिल्लीत बैठक घेतली.

**मतदान**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात साठी 15 जिल्ह्यातल्या 43 विधानसभेच्या जागांसाठी आज मतदान होत आहे. सकाळी 7 वाजता मतदानाला सुरुवात झाली असून मतदानासाठी सर्वत्र कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यातल्या 31 विधानसभा मतदार संघातली 950 अतिसंवेदनशील मतदान केंद्र असून तिथ 4 वाजेपर्यंत मतदान सुरू राहील. भाजपचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन, राज्यसभा सदस्य महुआ माजी, कॉंग्रेस नेते रामेश्वर ओराओ आदि नेत्यांचं भवितव्य आज मतपेटीत बंद होणार आहे.

दरम्यान, राज्यातील नक्षलवादाचा धोका लक्षात घेऊन मतदान प्रक्रियेच्या वेळी निमलष्करी दलाच्या जवानांच्या 200 तुकड्या तैनात करण्यात आल्या असून, उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि ओडिशा या बाजूच्या राज्यांच्या सीमा सील करण्यात आल्या आहेत. झारखंडचे मुख्य निवडणूक अधिकारी के रवी कुमार यांनी नागरिकांना निर्भयपणे मुक्त वातावरणात जास्तीत जास्त मतदान करण्याच आवाहन केलं आहे.

**पोट निवडणूक**

देशातल्या 11 राज्यातील 33 विधानसभा जागांसाठी तसच केरळ मधल्या वायनाड लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. राजस्थानमधल्या ७ , पश्चिम बंगाल ६ , आसाम ५, बिहार ४, कर्नाटकमधल्या ३ तर मध्यप्रदेश आणि सिक्कीम मधल्या 2 विधानसभा जागांसाठी ही पोटनिवडणूक होत आहे. तसंच केरळ, छत्तीसगड, गुजरात आणि मेघालय मधील विधानसभेच्या प्रत्येकी एका जागेवरील पोटनिवडणुकीसाठी आज मतदान होत आहे.
हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात...

**महाराष्ट्रनिवडणूक**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असून काल विविध राजकीय पक्षांच्या केंद्रिय नेतृत्वाच्या प्रचारसभा झाल्या. भाजपा नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यासह सोलापूर आणि चंद्रपूर जिल्ह्यात चिमूर इथं प्रचारसभा घेतली. राज्यातल्या महायुती सरकारने महाराष्ट्राच्या विकासाची गती अभूतपूर्व ठेवली आहे. देशात मोठ्या प्रमाणात परकीय गुंतवणूक झाली असून त्यात महाराष्ट्र आघाडीवर आहे. महायुती हाच राज्याच्या विकासाचा पर्याय आहे, असं मोदी म्हणाले. कॉंग्रेसनं कलम ३७०द्वारे जम्मू-काश्मीर आणि राज्यघटना यांच्यात भिंत निर्माण केली आणि त्यामुळे खोऱ्यात दहशतवादाला पाठिंबा मिळाला असा आरोप त्यांनी केला.

भाजपचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही काल मुंबईत दोन प्रचारसभा घेत विरोधकांवर हल्लाबोल केला.
मुंबई ठाण्यासह संपूर्ण कोकणात महायुतीला ६० पेक्षा जास्त जागा मिळतील असा विश्वास भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली इथं व्यक्त केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेतली.

विरोधी पक्षांच्या नेत्यांनीही काल राज्यात ठिकठिकाणी जोरदार प्रचार सभा घेत सत्ताधारी पक्षांवर कडाडून टीका केली.
राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी नाशिक जिल्ह्यात कळवण, दिंडोरी आणि निफाड इथं प्रचारसभा घेतल्या.

कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी गोंदिया इथं प्रचारसभा घेतली. भाजपा सरकार सोयाबीन आणि कापसाला योग्य हमीभाव देत नसल्याची टीका त्यांनी केली. जातनिहाय जनगणनेचं आणि आरक्षणावरची ५० टक्क्यांची मर्यादा हटवण्याचं आश्वासन त्यांनी पुन्हा एकदा दिलं.

महाविकास आघाडी सत्तेत आल्यावर जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवू असं आश्वासन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी लातूर जिल्ह्यात औसा इथल्या प्रचारसभेत दिलं.

**सर्वाधिकउष्णवर्ष**

दर महिन्याच्या जागतिक सरासरी तापमानात मोठी वाढ दिसून येण्याचा कालावधी लांबल्यामुळे २०२४ हे आतापर्यंतचं सर्वाधिक उष्ण वर्ष ठरण्याची शक्यता आहे. कॉप २९ परिषदेत जागतिक हवामान संस्थेनं सादर केलेल्या अहवालात हे नमूद केलं असून पॅरीस करारातली उद्दीष्टं धोक्यात असल्याचं म्हटलं आहे. या उद्दीष्टानुसार जागतिक सरासरी तापमानवाढ २ अंश सेल्सिअसपेक्षा कमी राखणं अपेक्षित आहे आणि ही वाढ दीड अंशापेक्षा कमी राखण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करत राहण्याचा निर्धार पॅरीस करारात करण्यात आला होता. मात्र गेल्या सहा महिन्यातल्या आकडेवारीनुसार ही सरासरी १ पूर्णांक ५४ शतांश असल्याचं आढळून आलं आहे. तापमानवाढीतला प्रत्येक अंश महत्त्वाचा आहे आणि त्यामुळे हवामानातले टोकाचे बदल, त्याचे परिणाम, धोका यात वाढ होऊ शकते असं जागतिक हवामान संस्थेचे सरचिटणीस सेलेस्टे साउलो यांनी म्हटलं आहे.

**संगीतमहोत्सव**

बांग्लादेशमधल्या भारतीय उच्चायुक्तालयानं ढाका इथं काल संध्याकाळी काझी नझरुल इस्लाम यांच्या श्याम संगीताचा कार्यक्रम आयोजित केला होता. बांग्लादेशचे राष्ट्रीय कवी असलेल्या नझरुल यांनी कालीमातेच्या शेकडो भक्तीगीतांची रचना केली आहे. या रचनांना श्याम संगीत म्हणून ओळखलं जातं. मृदुला समद्दर आणि बिजोन चंद्र मिस्त्री यांनी यावेळी श्याम संगीतातल्या निवडक रचना सादर केल्या. तर टिटो मुन्शी यांनी नझरुल यांनी लिहीलेल्या काली मातेवरील कविता सादर केल्या.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण अफ्रिका संघांदरम्यान आज तिसरा वीस षटकांचा क्रिकेट सामना होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री साडेआठ वाजता सेन्च्युरियन इथल्या सुपरस्पोर्ट पार्क मैदानावर हा सामना सुरू होईल. चार सामन्याच्या या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.